ऐसा वोलांतरला काजी | जो श्रद्धेचांचि समाजी | बुडाला त्या हो जी | कवणगति || ४३६|६|ज्ञा.

वरच्या ओवीचे अर्थ निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे दिले आहे. काजी म्हणजे कर्तव्यासंबंधी, वोलांतरला म्हणजे फसला किंवा उशीर झाला. थोडक्यात योग साधना चालू असतांना ती पूर्ण झाली नाही हे खरे परंतु योगाभ्यासाबद्दल त्याला श्रद्धा मात्र होती आणि अशातच तो जर मरण पावला तर त्याचे पुढे काय होते असा प्रश्न अर्जुनाने विचारला आहे. त्या बद्दल मी मल्लीनाथी न केलेली बरी परंतु त्या प्रश्नाचे उत्तर गीतेने सविस्तरपणे दिले आहे. एवढेच नव्हे तर ते स्पष्टही आहे. इथे गीतेने हातचे चोरून ठेवलेले नाही. त्या उत्तरात इहलोकी किंवा परलोकी त्याचा नाश होत नाही. शुभ कर्म करणारा कोणीही दुर्गतीला जात नाही व तिथे अनेक वर्षे वास केल्यानंतर शुद्धाचरणी व वैभवशाली कुळामध्ये जन्म पावतो किंवा बुद्धिमान योग्यांच्या घरात तो जन्मतो. हा जन्म फार दुर्लभ आहे. त्याच्यावर पूर्वजन्माचे संस्कार असतात त्यामुळे तो पुन्हा योगसिद्धीसाठी प्रयत्न करतो. तो परतंत्र खराच परंतु पूर्वजन्मामुळे तो वेदरहस्याचे गूढ अनुभव घेतो आणि त्याला समाधि सहज साध्य होते. अशा अनेक जन्मानंतर तो पापशुद्ध होऊन योगस्थिती मिळवत मोक्षाला पोहोचतो. आणि शेवट श्रीकृष्ण एक विधान करतो. “तपी ज्ञानी आणि कर्मी ह्यांच्याहून योगी श्रेष्ठ आहे असे माझे मत आहे म्हणून अर्जुना तु योगी हो. आणि नंतर श्रीकृष्ण असेही म्हणतो की माझ्या ठिकाणी जडलेल्या अंतःकरणाने युक्त होऊन जो मनुष्य श्रद्धेने माझी भक्ति करतो तो सर्व प्रकारच्या योग्यांपेक्षा श्रेष्ठ प्रकारचा योगी मला वाटतो”. ह्या श्लोकानंतर सहावा अध्याय संपतो. गीतेमध्ये या श्लोकांद्वारे पुनर्जन्म ह्या विषयावर जे शिक्कामोर्तब केले आहे तितके गीतेत इतरत्र कोठेही नाही. आणि शिवाय निरनिराळ्या प्रकारच्या योगांवर प्रवचन देऊन झालेले असताना इथे एक मनावर ताबा ठेवणारा आणि श्रीकृष्णावर श्रद्धा ठेवणारा एक थोडा निराळा योगी वर्णन करण्यात झाला आहे. ह्या श्लोकांची किंवा ओवींची चिरफाड करणे शक्य आहे परंतु ते मी टाळतो भीतिमुळे नव्हे तर परंपरांना फार लाथाडू नये म्हणून. पण इथल्या एका ओवीत ज्ञानेश्वर स्वतःचे वर्णन करतात असा एक समज आहे.

मोटकी देहाकृति उमटे | आणि निजज्ञानाची पहाट फुटे | सूर्या पुढा प्रगटे | प्रकाशु जैसा || ४५२|६|ज्ञा.

इथे लहान वयात ज्ञान झालेले ज्ञानेश्वर स्वतः बद्दल बोलत आहेत असे समजले जाते. सुर्योदयापूर्वीचे हे तांबडे आहे अशी कल्पना आहे.

३३६ शब्द

**रविन थत्ते**

**rlthatte@gmail.com**

मग समग्राते जाणसी ऐसे | आपुलिया तळातीचे रत्न जैसे | तुज ज्ञान सांगीन तैसे | विज्ञानेसि || २/७/ज्ञा.

तळहातावर ठेवलेले रत्न जसे पूर्णपणे न्हाहाळता येते त्याप्रमाणे मला संपूर्णपणे जाणशील असे ज्ञान मी तुला विज्ञानासकट सांगीन अशी ही ज्ञानेश्वरांची ओवी आहे. ती गीतेच्या सातव्या अध्यायातल्या पहिल्या श्लोकावर बेतलेली आहे. विज्ञानाची आपल्यातली व्याख्या प्रपंचाचे ज्ञान अशी आहे. त्यापासून अनुमाने काढत किंवा स्वयंस्फूर्तपणे ह्या विश्वामागाचे (प्रपंचा मागचे) रहस्य इथे सांगितले जाईल असे आश्वासन इथे देण्यात येते. पंच महाभूतापासून उत्पन्न झालेला तो प्रपंच. धारणा अशी की पंचमहाभूते अलीकडची आहेत. ब्रह्म त्याच्या आधीचेच नव्हे तर चिरकालीन आहे. त्याच्या बद्दलची जाणीव (माहिती नव्हे) म्हणजे ज्ञान. इथे दोन्हींबद्दल सांगितले जाणार आहे. परंतु ज्ञान आणि विज्ञानामधले अंतर इथे ज्ञानेश्वर जास्त विस्ताराने सांगतात. त्यात विज्ञान आधी समजवून घ्यावे लागते असे विधान करतात. मग एक ओवी सोडून म्हणतात "विज्ञानालाच जर तुम्ही अंतिम सत्य मानू लागलात तर तुम्ही अज्ञानी ठरता". त्याच्या आसपासच्या ओव्या म्हणतात "ज्ञानाच्या जाणीवेमुळे डोळे मिटतात आणि किनाऱ्याला लागलेली नाव जशी हलत नाही तशी स्थिरता लाभते". ह्या स्थिरतेत विचार मागे फिरतात बुद्धीचा प्रवेश होऊ शकत नाही आणि तर्काचे चातुर्य चालत नाही. (विचार मागुला पाउली निघे | तर्क आयणी निघे ||७|७|ज्ञा.) म्हणजे हे ज्ञान झाल्यावर अज्ञान अवघे हरपे आणि विज्ञान निःशेष करपे अशीही स्थिति होत असल्याचे वर्णन किंवा विधान आहे. हा विषय ज्ञानेश्वरांनी त्यांच्या अमृतानुभव ह्या संपूर्णपणे स्वतंत्र ग्रंथात जास्त सखोलपणे चर्चिला आहे. त्यात ज्ञान स्वयंभू आहे. मनुष्ययोनितल्या उपाधींमुळे अज्ञान प्रसूत होते आणि हे अज्ञान जर मिटले तर काहीच उरत नाही कारण जे स्वयंभू आणि चिरंतन असते त्याला असणे नसणे असल्या व्याधि नसतात असे अनुमान मांडण्यात आले आहे. मी माणूस असल्यामुळे आणि विज्ञान आणि अज्ञानाने वेढला असल्यामुळे ही बौद्धिक कसरत वाचायला बरी वाटते पण आत काही शिरत नाही. बरे गीता ज्ञानेश्वरी अशा तऱ्हेने समजवून सांगण्याचा प्रयत्न करत असल्यामुळे हे सगळे थोतांड तर नाहीना असे म्हणण्याची हिमंत किंवां (संस्कृतात) धारिष्ठ्यही होत नाही. परंतु ही लेखमाला तर थांबवायची नाही असा निर्धार असल्यामुळे पुढे येणाऱ्या श्लोकांमधून आणि ओव्यांमधून काय डोक्यात शिरते आणि पटते ह्याबद्दल लिहणे भाग पडणार आहे. ते सगळे पुढच्या लेखांमधून.

३२३ शब्द

**रविन थत्ते**

**rlthatte@gmail.com**